आर.सी.सी. क्र.४१८/२०२२

नि.क्र.४९

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – दादाभाऊ कोंडीबा बाबर

वय – ७० वर्षे, व्यवसाय – शेती

रा. – वडनेर, ता.पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. पटेकर यांचेमार्फत–**

मयुर माझ्या पुतण्या आहे व हनुमंत बाबर हा माझा भाऊ आहे. ते आमच्या शेजारी राहतात. फिर्यादी माझी सुन असुन ती गावातील वस्तीमध्ये राहते. मयुर सैन्यात आहे. घटना २/३ वर्षापुर्वी घडली. त्यादिवशी फिर्यादी व आरोपींमध्ये फिर्यादीच्या घरी भांडण झाले होते. घराच्या कारणावरुन भांडण झाले होते. ते भांडण मी पाहीले होते. त्यांच्यात शिवीगाळ चालु होती. त्यानंतर मी निघुन गेलो. घटनेसंदर्भात मला पोलीसांनी निघोजला बोलावले होते व माझा जबाब घटना घडल्यानंतर दुस–या दिवशी घेतला होता. आजरोजी आरोपी हनुमंत हजर असुन मयुर गैरहजर आहे. मयुरला दाखवल्यास मी ओळखु शकतो.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.एल. औटी यांनी नाकारला.**

हनुमंत माझा चुलत भाऊ आहे. हनुमंतचा सख्खा भाऊ खंडु आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे घर उगवतीला आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळापासुन माझे घर ५०० फुट अंतरावर आहे. मी सांगतो की २० फुट अंतरावर असेल. हे म्हणणे खरे आहे की हनुमंतच्या घराच्या मागे खंडूचे घर आहे. माझे आरोपींकडे येणेजाणे नाही. आमच्या जमिनी शेजारी शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की हनुमंत बाबर गावातील बाबर वस्तीत किंवा वडनेर गावातील वाकण वस्तीत राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की २/४ वर्षापासुन त्यांची जमिन पडीक आहे. हनुमंत बाबरने त्याच्या मुलांना जमिन वाटप करुन दिले का नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की हनुमंतने करुन दिलेल्या मयुरसाठी व उत्तमसाठी रुम एकमेकाच्या शेजारी असुन त्यामध्ये भिंत आहे. घटनेच्या वेळी कोणी लोक जमले नाही. हे म्हणणे खरे आहे की वडीलांचे व मुलाचे

भांडण कायम चालु असते. हे म्हणणे खरे आहे की भांडण कशावरुन आहे याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की हनुमंतने दिलेल्या २ खोल्यांच्या शेजारी गोठा आहे.

प्रश्न– शरद बाबरचेघर आरोपी व फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे आहे?

उत्तर– खंडुच्या घराच्या पाठीमागे आहे.

घराच्या पुढे भांडणे चालु होती. भांडणे कशावरुन चालु होते याची मी चौकशी केली नाही कारण त्यांचे भांडण कायम चालु असते.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.12.09 17:52:35 +0530

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः०९/१२/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पारनेर